
## निवडक



नाटकातील दृश्य.

## मोरजीत आज 'संगीत ताजमहाल'

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १४ :** मोरजी येथील सार्वजनिक गणेशोत्सवात रविवार दि. १५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता मुंबई येथील श्रीगणेश प्रॉडक्शन प्रस्तुत व रत्नागिरी येथील खल्वायन निर्मित 'संगीत ताजमहाल' या नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या २०20 मधील राज्य नाट्य स्पर्धेत दहा वैयक्तिक पारितोषिकांसहीत प्रथम क्रमांक पटकावलेले हे नाटक ताजमहालासंदर्भातील ऐतिहासिक सत्यावर आधारित असून, सुप्रसिद्ध संवादिनी वादक डॉ. विद्याधर ओक हे या नाटकाचे लेखक, गीतकार व संगीत दिग्दर्शक आहेत.

मनोहर जोशी दिग्दर्शित या नाटकाचे श्रीनिवास जोशी हे सूत्रधार असून, या नाटकात सुप्रसिद्ध गायक अजिंक्य पोंक्षे, युवा गायिका सावनी पारेकर, नव्या दमाचा गायक वरद केळकर तसेच अनिकेत आपटे, प्रदीप तेंडुलकर, स्मिता करंदीकर व विजय जोशी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. अमित ओक (ऑर्गन) व प्रथमेश शहाणे (तबला) या युवा कलाकारांची संगीतसाथ या नाटकास लाभली आहे.

डॉ. विद्याधर ओक यानी अनेक वर्षे संशोधन करून लिहिलेल्या महत्त्वपूर्ण अशा ऐतिहासिक विषयावरील या नाटकाचा प्रयोग गोव्यात प्रथमच होत असल्याने इतिहास तथा नाट्यप्रेमींनी या नाट्यप्रयोगास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन मोरजी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अमित शेटगावकर यानी केले आहे.

---

## उदय ताम्हणकर यांच्या कविता संग्रहावर २१ रोजी चर्चा

टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १४ :** गोमंतक मराठी अकादमीच्या मासिक कार्यक्रमाचा भाग म्हणून शनिवारी दि. २१ रोजी संध्याकाळी ४ वाजता गोमंतक मराठी अकादमी व भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने उदय ताम्हणकर यांच्या 'उडेन पुन्हा एकदा' या कविता संग्रहावर पर्वरीतील गोमंतक मराठी अकादमीच्या सभागृहात चर्चासत्र आयोजित केले आहे.

पर्वरी येथील मराठी भवनात साहित्यिक पूर्णिमा केरकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. या कविता संग्रहावर आयडिया एज चे संस्थापक गौरीश नाईक व साहित्यिक गुलाब वर्णेकर हे भाष्य करणार आहेत. सन्माननीय अतिथी म्हणून भारतीय सांस्कृतिक मंच गोवाच्या अध्यक्षा डॉ. रेखा पौडवाल, अध्यक्ष प्रदीप घाडी आमोणकर, पत्रकार प्रभाकर ढगे आणि कवी उदय ताम्हणकर उपस्थित राहणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

---

## मेणकुरे येथे गौरी सण उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १४ :** मेणकुरे येथे देवी गौरीचे पूजन उत्साहात करण्यात आले. देवाच्या तीर्थ विहिरीवरून गौरी आणण्यात आली विसर्जन मुहूर्तावर देवी म्हणजे तीर्थ देवीच्या विहिरीवरून आणली. गौरी आणतेवेळी आगमनामध्ये पत्री, सात फुल पत्रे, पाने, सात शिंपले, सात लहान दगड, चिडडो, आंबेचो टाळो, हळद थांब, हळद पिंजर, नारळ, अगरबत्ती, वल्ली, तांम्हाण,अक्षता ही सामग्री घेऊन तीर्थ विहिरीजवळ येतात. याच ठिकाणी श्री माऊली देवीचा वार्षिक जत्रोत्सव मालिनी पौणिमा दिवशी साजरा होतो तसेच विहिरीतील तीर्थाला पवित्रेचे व अवषधी महत्व आहे. देवीच्या विहिरीवर जाऊन गावातील पालटदारद्वारे तीर्थ कलशामध्ये देण्यात आले, त्या कळशाची पूजा करून तीन वेळा तीर्थ आचमन केले व घरी येताना तीर्थ तोंडामध्ये ठेऊन देवी घरामध्ये आणली व अंगारा लावून घरात प्रवेश केला नंतर पूजा केली.

देवीला नेवेध पान दाखवले व व्हवशे भरून प्रथम देवाला अर्पण केले व घरच्या वरिष्ठ लोकांना तसेच इतर लोकांना देण्याची परंपरा आहे. संध्याकाळी उत्तर पूजा करून देवीला भाजी भाकरीचा नेवैध दाखवला व कलशातील तीर्थ पुन्हा देवाच्या विहिरीवर जाऊन विसर्जित केले . व त्या ठिकाणी प्रसाद म्हणून भाजी भाकरी व न्हावण (तीर्थ ) ग्रहण केले व सर्व कार्यक्रमाची सांगता झाली.

# शालेय गणवेशातून आपल्या विद्यालयाची ओळख

- मिथिल ढवळीकर
- आनंदीबाई महानंदू नाईक विद्यालयात गणवेश वितरण

टीम दैनिक हेराल्ड



करंजाळ मडकई : विद्यार्थ्यांना गणवेश वह्या वितरित करताना मिथिल ढवळीकर. सोबत दामोदर नाईक, शैलेंद्र पणजीकर, श्याम नाईक, भारत नाईक व इतर.

**बोरी, दि. १४ :** विद्यार्थ्यांनी शालेय गणवेश परिधान केला पाहिजे. गणवेश शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि समानता दर्शवतो. शाळेत मुलांना दररोज वेगवेगळे कपडे देण्यापेक्षा गणवेश सोयीस्कर असतो. गणवेशामुळे समानतेची भावना जागृत होते, असे मत माधवराव ढवळीकर ट्रस्टचे संचालक मिथिल ढवळीकर यांनी व्यक्त केले. करंजाळ मडकई येथील श्रीमती आनंदीबाई महानंदू नाईक पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात गणवेश वितरणाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमच्या वेळी जिल्हा पंचायत सदस्य दामोदर नाईक यांनी प्राथमिक शाळेसाठी नवीन शौचालय बांधून देण्याचं आश्वासन दिले कुणी कितीही श्रीमंत असला तरी शाळेत मात्र गणवेशामुळे सगळे समान पातळीवर येतात, असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर मडकई सरपंच शैलेंद्र पणजीकर, उपसरपंचा संध्या नाईक, पंच विशांत नाईक, शाळेचे अध्यक्ष श्याम नाईक, व्यवस्थापक माजी मुख्याद्यापक दिनेश नाईक, मुख्याध्यापक भारत ऊर्फ उमाकांत नाईक, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष नीलेश नाईक, सर्वेश नाईक, माजी सरपंच दीपा नाईक, संगीता नाईक, चंदन कवळेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व ओळख भारत नाईक यांनी केले. सूत्रसंचालन श्वेता नाईक यांनी केले. तर नरेश नाईक यांनी आभार मानले. सदर कार्यक्रम विद्यालयाच्या सभागृहात झाला. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरमल पार्सेकर महाविद्यालयांच्या अध्यक्षपदी अनिल पाटील यांची निवड



हरमल : पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पालक–शिक्षक अध्यक्षपदी अनिल पाटील यांना पुष्पगुछ देताना प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित सोबत प्रमोद केरकर व इतर.

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १४ :** गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पालक शिक्षक संघटनेच्या नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षस्थानी अनिल पाटील यांची निवड करण्यात आली.

सदर कार्यकारणी सन २०२४–२५ करिता निवड करण्यात आली. पालक शिक्षक संघटनेच्या कार्यकारिणीची सभा नुकतीच झाली. यामध्ये नूतन सदस्यांचे स्वागत करण्यात आले तसेच नूतन अध्यक्ष म्हणून अनिल पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सभेस महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित, तसेच पालक शिक्षक संघटनेचे सर्व सदस्य, महाविद्यालयीन समितीचे समन्वयक श्री.प्रमोद केरकर व इतर सदस्य उपस्थित होते.

## चालत्या ट्रेनमधून पडून गोव्यातील तरुणीचा मृत्यू

टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. १४ :** कोकण रेल्वे मार्गावर लोलये आणि कारवार स्थानकांदरम्यान चालत्या ट्रेनमधून पडून गोव्यातील १७ वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. बुधवारी ती मडगाव–मंगळूर ट्रेनमधून प्रवास करत असताना ही घटना घडली. भरधाव वेगाने जात असलेली ही ट्रेन लोलये बोगदा ओलांडून सदाशिवगड – कर्नाटकच्या माजळी जंगल परिसरातून जात असताना हा अपघात झाला. ट्रेनच्या जोरदार धक्क्यामुळे ती खाली पडली तेव्हा मुलीने मोबाईल फोन धरला होता आणि ट्रेनच्या उघड्या दरवाजाच्या काठावर उभी होती, असे अहवालात म्हटले आहे.

मुलगी रेल्वे रुळापासून काही मीटर दूर फेकली गेल्याची माहिती आहे. कारवार पोलिस आणि कोकण रेल्वे पोलिस दोघेही सतर्क झाले आणि घटनास्थळी दाखल झाले. मात्र, रुळांपासून काही अंतरावर मृतदेह आढळून आल्याने त्याच्या अधिकारक्षेत्राबाबत सुरुवातीला संभ्रम निर्माण झाला होता. रेल्वे रुळांपासून ठराविक अंतरावरील घटनांना जबाबदार असलेले रेल्वे पोलिस सुरुवातीला मृतदेह ताब्यात घेण्यास टाळाटाळ करत होते, कारवार पोलिसांनी तपास हाताळावा, असे सुचवले होते. अखेर रेल्वे पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मृतदेह कुटुंबीयांकडे परत करण्यात आला आणि गुरुवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पर्वरी पोलिस स्थानकातील गणेशोत्सव उत्साहात

. टीम दैनिक हेराल्ड



पर्वरी : सत्यनारायण पूजेच्या यजमानपदी मयूर सावंत दांम्पत्य

**पर्वरी, दि. १४ :** पर्वरी पोलिस स्थानकातील गणेशोत्सवानिमित्त शनिवारी सत्यनारायण महापूजेचे आयजन करण्यात आले.

यावेळी यजमान म्हणून उपनिरीक्षक मयूर सावंत दांपत्याने यजमानपद भूषवले होते. गणेशोत्सवानिमित्त सकाळी विविध धार्मिक विधी, त्यानंतर सत्यनारायण महापूजा, आरती तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात आले.

ायंकाळी महिला भजनी कलाकारांतर्फे भजनाचा खास कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर गोव्यातील नामवंत कलाकारांचा स्वर सार्थक हा सुगम संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गायक कलाकार गीतगंधा गाड, संदेश खेडेकर आणि सिद्धी सुर्लकर पिळगावकर यांनी बहारदार सुगम गीते सादर करून रसिकांची दाद मिळवली.

नऊ दिवसांच्या गणेशोत्सवात पर्वरी पोलीस स्थानकात विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. गणेशाची भव्य मूर्तीचे मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शन घेतले. आज सायंकाळी श्रीगणेशाचे बेती येथील मांडवी नदीत ढोल ताशांच्या आणि वाद्यसंगीताच्या तालावर मिरवणुकीने विसर्जन करण्यात येणार आहे.

## कुरतरकर ग्रीन्सचा राजाचे थाटात विसर्जन

टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १४ :** कुरतरकर ग्रीन्स कॉलनी, रावणफोंड येथील कुरतरकर ग्रीन्सचा राजा हा सार्वजनिक गणेशोत्सव पाच दिवस मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहाने साजरा झाला. या सार्वजनिक गणेशोत्सवाचे हे पहिलेच वर्ष होते. कॉलनीतील सर्व रहिवाशांनी पाच दिवस या गणेशोत्सवात उत्साहाने सहभागी होऊन हा गणेशउत्सव पाच दिवस मोठ्या भक्तीभावात साजरा केला. श्री बाल गणेश आरती मंडळ तसेच मडकई आरती मंडळच्या कलाकारांनी या गणेशोत्सवात आपल्या सामूहिक आरत्या व घुमटवादन सादर केले. पाचव्या दिवशी श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन केले गेले. अभय तळावलीकर, सन्मान केणी, राजेश कुमार यांच्या सहकार्याने महाप्रसाद तसेच फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. कुरतरकर ग्रीन्स च्या महिला मंडळ सदस्यांनी पाच दिवस बाप्पा समोर पारंपारिक फुगड्या घालून सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले. समितीचे अध्यक्ष जयंत प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश नाडकर्णी, प्रीतेश लोटलीकर, उल्हास शानभाग , डॉ. विनय साबळे, दामोदर देसाई आदींनी हा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी अथक प्रयत्न घेतले.

## देश भक्ती गायन स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल प्रथम

टीम दैनिक हेराल्ड




मांद्रे : देश भक्ती गायन स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात बोलताना प्रा. गोरख मांद्रेकर. सोबत चेअरमन रमाकांत खलप, प्राचार्य सीताराम आश्वेकर व शरद गावडे.

**हरमल, दि. १४ :** मांद्रे येथील विकास परिषद संस्थेच्या स्थापना दीन निमित्त सप्तेष्वर उच्च माध्यमिक विद्यालयाने आंतरशालेय देश भक्ती गीत गायन स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत प्रथम केरी न्यू इंग्लिश हायस्कूल, द्वितीय वसंत विद्यालय शिवोली, तृतीय विद्याप्रसारक हायस्कूल मोरजी उत्तेजनार्थ बक्षिसे कमळेश्वर हायस्कूल कोरगाव व रमाकांत खलप याना देण्यात आले. या स्पर्धेत १० विद्यालयानी भाग घेतला होता.

सदर कार्यक्रम संस्थेचे दिवंगत सभासद अशोक मांद्रेकर, रमेश देसाई, स्व. बापला नाईक, स्व. गणपत शेट मांद्रेकर यांच्या स्मरणार्थ आयोजित केला होता. उद्घाटन सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष रमाकांत खलप, उद्घाटक ज्येष्ठ कलाकार व परीक्षक गोरख मांद्रेकर व राजेंद्र सिंगबाळ, सदस्य गोविंद आजगावकर, पंच राजेश मांद्रेकर, प्राचार्य सीताराम आश्वेकर, हायस्कूलचे मुख्याध्यापक शरद गावडे, राया नाईक, वैशाली देसाई उपस्थित होते.गायन करताना गायकांनी स्वर व ताल यावर मेहनत घ्यायची गरज असते.समूहगीत गायनात अनेक नवीन बदल होत आहेत व त्यामुळे अशा गायन स्पर्धा उत्कंठा वाढवणाऱ्या ठरल्या आहेत.संस्थेने योग्य प्रकारे स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल विद्यार्थी व अध्यापकांचे अभिनंदन असल्याचे मत प्रा. गोरख मांद्रेकर यांनी व्यक्त केले. विकास परिषद संस्थेने तालुक्यात ज्ञानदानाचे कार्य चालवले असून गावातील सहृदयी नागरिकाने सहकार्य केल्याचे चेअरमन खलप यांनी व्यक्त केले. सूत्रनिवेदन ईश्वरी जोशी, स्वागत व प्रास्ताविक आर्या जठार,प्रा अजय देसाई यांनी पाहुण्याची ओळख तर विद्यार्थी संकेत जोशी यांनी आभार मानले.




वास्को : चिखली येथील चिखलीचा राजाची सुंदर गणेशमूर्ती.



हेडलँड सडा येथील प्रतोष पिर्णकर यांच्या निवासस्थानातील गणेशमूर्ती.



वास्को : येथील राहुल हळणकर यांच्या निवसस्थानी पुजलेला गणपती.



हेडलँड सडा येथील ओंमकार मेस्त यांच्या निवसस्थानी पुजलेली गणेशमूर्ती.